दिनांक :- 20/11/2022

# प्रेस नोट

## देगलुर येथील दिवसा घरफोडी करणारा आरोपी नगदी 1,49,000/- रुपयाचे मुद्येमालासह अटक

***स्थानिक गुन्हे शाखा , नांदेडची कार्यवाही***

माली गुन्हयातील गुन्हेगारांना अटक करण्याबाबत मा. श्रीकृष्ण कोकाटे , पोलीस अधीक्षक , नांदेड यांनी पोलीस निरीक्षक, स्थागुशा नांदेड यांना आदेशीत केले होते. त्यानुसार पोलीस निरीक्षक, स्थागुशा , नांदेड यांनी वेगवेगळी पथके तयार करुन मालाविषयीचे गुन्हयातील आरोपीचा शोध घेणे चालु होते.

दि.19/11/2022 रोजी सायंकाळी श्री व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड यांना गूप्त बातमीदाराकडून खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस ठाणे देगलुर गु र नं. 512/2022 कलम 454,380 भा द वि गुन्हयातील आरोपी हा बसस्थानक , नांदेड येथे असल्याबाबत खात्रीशीर माहीती मिळाल्याने त्यांनी तशी माहीती मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांना दिल्याने पोलीस अधीक्षक , नांदेड यांनी श्री व्दारकादास चिखलीकर यांना स्टाफ रवाना करण्याबाबत आदेशीत केले. पो नि स्थागुशा यांनी स्थागुशाचे अधिकारी व अमंलदार रवाना केले. स्थागुशा चे पथकाने बसस्थानक नांदेड येथे जावुन सापळा रचुन आरोपी नामे **रामेश्वर ऊर्फ रामा किशोर कुंभार वय 21 वर्ष रा. पिंपळगाव (गाडे) ता. परळी जि. बिड** यास पकडुन विचारपुस करता त्यांनी पोलीस ठाणे देगलुर गु र नं. 512/2022 कलम 454,380 भा द वि हा गुन्हा त्यांनी व त्याचा साथीदार नामे यशवंत बालाजी मिरजगावे रा लातुर यांनी केला असल्याची कबुली दिली. त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता , त्याचे बॅग मध्ये देगलुर येथुन चोरी केलेले रुपयापैकी नगदी 1,40,000/- रुपये व चोरीच्या पैशातुन खरेदी केलेला एक टेक्नो कंपनीचा मोबाईल किंमती 9,000/- रुपयाचा असा एकुण **1,49,000/-** रुपयाचा मुद्येमाल हस्तगत करण्यात आला असुन नमुद आरोपीस पोलीस ठाणे देगलुर येथे पुढील तपासकामी देण्यात आले आहे. नमुद आरोपीकडुन आणखीन गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधीक्षक, नांदेड यांच्या मार्गदर्शनाखाली, श्री व्दारकादास चिखलीकर पोलीस निरीक्षक स्थागूशा नांदेड , पोउपनि /सचिन सोनवणे , सपोउपनि / संजय केंद्रे , पोह/ गुंडेराव करले , पो ना / अफजल पठाण , संजय जिंकलवाड , विठल शेळके , पो कॉ / गजानन बयनवाड, चा पो ह / शंकर केंद्रे , पोह / दिपक ओढणे , राजु सिटीकर यांनी पार पाडली आहे. सदर पथकाचे मा. पोलीस अधीक्षक नांदेड यांनी कौतुक केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
**पो. अ. कार्यालय नांदेड**